बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकारितेला माझे नेहमीच सहकार्य राहिल : आ. सिद्धार्थ खरात >>पान 2

शिरपूर येथे जानगीर बाबा यांची महाशिवरात्री निमित्य भव्य यात्रा >>पान 3

टोमॅटोची लाली उतरली; दर गडगडल्याने खर्चही निघेना >>पान 4

**सुविचार**
आत्मविश्वास हा यशाचा खरा मार्गदर्शक आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलढाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 187 ■ सोमवार, दि. 17 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





'छावा' सिनेमाची रेकॉर्ड ब्रेक कमाई, दुसऱ्या दिवसाचं कलेक्शन बघून चक्रावून जाल

आतील पान

# काँग्रेस उपनेते गौरव गोगोईच्या पत्नीचे पाकिस्तानच्या आयएसआय शी कनेक्शन ?

**नवी दिल्ली : लोकसभेतील काँग्रेसचे उपनेते गौरव गोगोई यांची ब्रिटिश पत्नी एलिझाबेथ कोलबर्न गोगोई यांचे पाकिस्तानच्या आयएसआय शी कनेक्शन असल्याच्या आरोपांची विशेष तपास पथक स्थापन करुन चौकशी केली जाण्याची शक्यता आहे. लग्नानंतर एलिझाबेथ कोलबर्न गोगोई या पाकिस्तानचे नागरिक असलेल्या किती लोकांच्या संपर्कात आहेत आणि ही मंडळी नेमकी कोणत्या स्वरुपाची कामं करतात ? यामुळे भारताच्या तसेच देशाच्या ईशान्य भागातील राज्यांच्या प्रामुख्याने आसाम च्या सुरक्षेला किती धोका आहे याचाही तपास होण्याची शक्यता आहे**





आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी एक्स पोस्ट (ट्वीट) केली आहे. यात त्यांनी एलिझाबेथ कोलबर्न गोगोई लग्नानंतर पाकिस्तानमध्ये जाऊन आल्याची माहिती हाती आल्याचे सांगितले. या संदर्भात आणखी माहिती लवकरच हाती येईल, असे सूतोवाच आसामच्या मुख्यमंत्र्यांनी केले आहे. यामुळे एलिझाबेथ कोलबर्न गोगोई यांची चौकशी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. गौरव गोगोई यांचे वडील तरुण गोगोई हे आसामचे मुख्यमंत्री होते. तरुण गोगोई हे मुख्यमंत्री असतानाच्या काळात पाकिस्तानच्या घएघ चे हात थेट मुख्यमंत्र्यांच्या टेबलपर्यंत पोहोचले होते का याचाही तपास होण्याची शक्यता आहे.

**कोण आहेत एलिझाबेथ कोलबर्न गोगोई ?**

काँग्रेसच्या गौरव गोगोई आणि एलिझाबेथ कोलबर्न यांची भेट संयुक्त राष्ट्र सचिवालयात २०१० मध्ये झाली. पुढे २०१३ मध्ये गौरव गोगोई आणि एलिझाबेथ कोलबर्न यांनी प्रेम विवाह केला. आधी या लग्नाला गौरव गोगोई यांचे वडील आणि आसामचे त्यावेळचे मुख्यमंत्री तरुण गोगोई यांची संमती नव्हती. पण नंतर तरुण गोगोई यांनी गौरव गोगोई आणि एलिझाबेथ कोलबर्न यांच्या लग्नाला संमती दिली. हाती आलेल्या माहितीनुसार, एलिझाबेथ कोलबर्न लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये शिकल्या आहेत. त्यांनी प्रामुख्याने स्वयंसेवी संस्थांमध्ये काम केले. सध्या एलिझाबेथ कोलबर्न गोगोई या ऑक्सफर्ड पॉलिसी मॅनेजमेंट या संस्थेसाठी काम करतात. पर्यावरणाच्या क्षेत्रात ही संस्था कार्यरत आहे. याआधी एलिझाबेथ कोलबर्न या सीडीकेएन नावाच्या पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेत कार्यरत होत्या. याच संस्थेच्या माध्यमातून पाकिस्तानचे घएघ त्यांच्या पहिल्यांदा संपर्कात आल्याचे वृत्त आहे.

लग्न झाले आणि मागील १२ वर्षांपासून एलिझाबेथ कोलबर्न भारतात आहेत. पण त्यांनी अद्याप भारताचे नागरिकत्व स्वीकारलेले नाही. आजही त्या ब्रिटिश नागरिक आहेत. भारतात व्हिसा आहे म्हणून वास्तव्य करत आहेत; असे आरोप त्यांच्यावर होत आहेत. पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करण्याच्या नावाखाली एलिझाबेथ कोलबर्न पाकिस्तानकरिता काम करतात भारतात देशविरोधी कामं करतात, असाही आरोप त्यांच्यावर होत आहे.

# नागपुरातील एक्सप्लोसिव्ह कंपनीत भीषण स्फोट

## दोन कामगारांचा जागीच मृत्यू; मृतांचा आकडा वाढण्याची

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर पोलिस स्टेशन हद्दीतील कोतवालबड्डी शिवारातून एक मोठी बातमी समोर आली आहे. या परिसरातील एका एक्सप्लोसिव्ह कंपनीमध्ये मोठा स्फोट झाल्याची माहिती पुढे आली आहे. एका खाजगी कंपनीत हा स्फोट झाला असून या ठिकाणी स्फोटक संबंधीत साहित्य तयार केलं जात असल्याची प्रथमिक माहिती पुढे आली आहे. मात्र, नेमका हा स्फोट कशामुळे झाला? हे अद्याप कळू शकलेले नाही.



परंतू हा स्फोट इतका भीषण होता की यात दोन कामगार मृत्युमुखी पडल्याची, तर दोघे जण जखमी झाल्याची प्रथमिक माहिती पुढे आली आहे. आज रविवार (१६ फेब्रुवारी) दुपारी दोन वाजता राऊळगाव जवळच्या कोतवालबड्डी शिवारात असलेल्या एशियन फायर वर्क या कंपनी मध्ये फटाक्यांची वात तयार करताना ही घटना घडली आहे.

दोन कामगारांचा मृत्यू, तर दोघे जखमी मिळालेल्या माहितीनुसार, आज रविवार (१६ फेब्रुवारी) च्या दुपारी दोन वाजताच्या सुमारास ही घटना घडली. मात्र स्फोटाच्या वेळेला कंपनीत मोठ्या संख्येने कामगार काम करत होते. मात्र, ज्या विशिष्ट प्लांटमध्ये हा स्फोट झाला, त्या ठिकाणी चार कामगार कार्यरत होते. त्यापैकी दोघांचा मृत्यू झाला आहे, तर इतर दोघे जखमी झाले आहे.

दरम्यान या परिसरात मोठ्या संख्येने स्फोटक तयार करणारे कारखाने असून त्यांच्यामध्ये अनेक वेळेला स्फोट किंवा औद्योगिक दुर्घटनेच्या घटना घडतात. त्यामुळे परिसरातील गावकऱ्यांची सुरक्षा धोक्यात येते, असा आरोप आता होत आहे. सरकार ने या परिसरातील कारखान्यांच्या कार्यपद्धतीची आणि तिथे अमलात असलेल्या सुरक्षेच्या उपायांचा आढावा घ्यावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे या मागणीचे गांभीर्य बघता यावर आता काय उपाययोजना केल्या जातात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. सध्या पुढील कारवाई पोलिसांकडून करण्यात येत आहे. मात्र या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## वारंवार तक्रारी तरीही देयक काढण्याची

# अधिकाऱ्यांची मुजोरी



भाग १५













## ■ अंजनी बुद्रुक येथील प्रकार
## ■ अधिकाऱ्यांना अभय कोणाचे?


**मेहकर: तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथील जल जीवन मिशन योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेमध्ये सुरुवातीपासूनच भ्रष्टाचार याबाबत ग्रामस्थांनी ग्रामसभेचा ठराव घेत वारंवार तक्रारी केलेल्या आहेत.मात्र, या तक्रारीला न जुमानता अधिकाऱ्याने मजुरी करत ठेकेदाराचे देयक काढून दिल्याने याबाबत उलट सुलट चर्चेला पेव फुटले आहे.या भ्रष्टाचारामध्ये अधिकारी व ठेकेदार हे संगणमताने शासनाच्या निधीला चुना लावण्याचे काम करीत असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.**

तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथील ग्रामपंचायतच्या वतीने तब्बल सात वेळा निवेदन दिले आहेत. परंतु, त्याची दखल घेण्यात आली नाही. केवळ पाईपलाईन अंथरून बिले काढून निधी हडप करण्यात आला आहे. विहिरीचे काम अर्धवट असताना केवळ आतुर मात्र कामे करून शासकीय निधीला चुना लावण्याचे काम करण्यात आले आहे. कोट्यवधी रुपयाच्या निधी खर्च करून करण्यात आलेल्या जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. तर, ग्रामपंचायतला लाखो रुपयाचा भ्रुदंड बसला आहे.गावातील मुख्य रस्त्यावर निकृष्ट दर्जाचे पाईप वापरण्यात आल्याने ते फुटून हजारो लिटर पाणी वाहून जात आहे. एकीकडे पाण्यासाठी जनतेची वाताहात सुरू असताना दुसरीकडे मात्र, निकृष्ट कामामुळे हजारो लीटर पाणी वाहून जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. सदर कामा संदर्भात वारंवार तक्रारी केल्यानंतरही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे डोळेझाक केल्याने यामध्ये अधिकारी व ठेकेदाराची मिली बघत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. जल जीवन मिशन अंतर्गत होत असलेल्या कामात सुरुवातीपासूनच भ्रष्टाचार होत असल्याने अंजनी बुद्रुक येथील ग्रामस्थांच्या वतीने वारंवार तक्रारी देण्यात आलेले आहे त्याचबरोबर ग्रामपंचायत त्यांनी ग्रामसभेत ठरव घेत मेहकर उपविभागीय अधिकाऱ्यांना याबाबत तक्रार देत आंदोलनाचा इशाराही दिलाय तरीही संबंधित मजूर अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांच्या या तक्रारीला केराची टोपली दाखवत ठेकेदाराचे देयक काढून दिल्याने या प्रकारामध्ये अधिकारी व पदाधिकारी ठेकेदार यांची मिलीभगत असल्याचे उघड झाले आहे. वारंवार तक्रारी केल्यानंतर अधिकाऱ्यांनी देयक कसे काढले असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.तक्रार केल्यानंतर अधिकाऱ्यांनी याबाबत चौकशी,करावी चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत देयक थांबवावे, असा नियम असताना अधिकाऱ्यांनी मात्र, चौकशीला ठेंगा दाखवत ठेकेदाराला देयक काढून दिल्याने या प्रकाराबाबत अधिकारी व ठेकेदार यांची मिलीभगत असल्याचे उघड झाली आहे या प्रकरणाची संबंधितांनी वरिष्ठांनी दखल घेत सखोल चौकशी करावी, शासनाचा निधी हडप करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारावर कारवाई करावी व ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची सुविधा करून देण्यासाठी तात्काळ पाईपलाईन पूर्ण करून नळ योजना सुरू करावी, अशी मागणी अंजनी बुद्रुक येथील ग्रामस्थांकडून होत आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

## भ्रष्ट अधिकाऱ्यावर कारवाई कोण करणार ? जनतेचा सवाल!



अंजनी बुद्रुक येथील जलजीवन मिशनच्या कामात झालेल्या प्रचंड भ्रष्टाचारानंतर वारंवार तक्रारी केल्या तरही तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे आता संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई कोण करणार?, वरिष्ठ अधिकारी या प्रकरणाकडे लक्ष देणार का?, व संबंधित पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील हे प्रकार हाताळणार का? की प्रकरणात तेरी भी चूप, मेरी चूप असा काही प्रकार घडणार का व गावकरी या जलजीवनच्या पाण्यापासून वंचित राहणार का? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. ज्यांच्याकडे न्याय मागितला त्यांनी दुर्लक्ष केल्याने,आता न्यायाची अपेक्षा कोणाकडून करावी असा प्रश्नही अंजनी बुद्रुक येथे ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.सदर कामात अधिकारी व ठेकेदार यांनी मिळून मिसळून शासकीय निधीवर डल्ला मारला असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत असन या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

# बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकारितेला माझे नेहमीच सहकार्य राहिल : आ. सिद्धार्थ खरात





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** : कौशल्य प्राप्त करून त्यावर आधारित नोकरी करणारा वर्ग हा पत्रकार नसून ज्याला समाजात बदल करायचा आहे, ज्याच्यामध्ये क्रांतीची उर्मी आहे, असा समाजातील वाईट घटना घडामोडींवर भाष्य करणारा वर्ग म्हणजे पत्रकार होय. मंत्रालयात सहसचिव तसेच वीस वर्ष विविध मंत्र्यांकडे खाजगी सचिव म्हणून कार्य केले. आता आमदार म्हणून जबाबदारी पार पाडत असतानाही बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकारितेला माझे नेहमीच सहकार्य राहिले, असे प्रतिपादन मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले.

बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने 'पत्रयोगी जीवन गौरव पुरस्कार सोहळा' रविवार १६ फेब्रुवारी रोजी गर्दे सभागृह बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्रसिद्ध न्यूज अँकर प्रसन्न जोशी, सिंदखेडराजा मतदारसंघाचे आमदार मनोज कायंदे, शहर ठाणेदार नरेंद्र ठाकरे, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजित राजपूत, उपाध्यक्ष मराठी पत्रकार परिषद चंद्रकांत बर्दे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की, भारताच्या स्वतंत्र लढ्यात पत्रकारांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे.लोकमान्य टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून लोकशाही टिकवण्यासाठी जीवाचे रान केले. परंतु आता माध्यमांवर संशय घेतला जात आहे, निवडणुकांच्या काळात हे प्रमाण तर खूप वाढले असल्याची खंत आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केली.

### विधानसभेत आवाज उठवणार

पत्रकारांना बाजूला करून कुठलाही शासनाचा कार्यक्रम यशस्वी करता येत नाही मात्र तरीदेखील शासन स्तरावरून पत्रकारांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे. तसेच महाराष्ट्र व देशाचे राजकारण कुठल्या वळणावर चालले आहे, हेच कळत नाही. आगामी काळात विविध प्रश्नांवर विधानसभेत आवाज उठवणार असल्याचा निर्धारही आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केला.

## क्रांतिकारकांचे गुरु वस्ताद लहुजी साळवे

आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी साताराचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्रि्चत करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्र्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# भाजपच्या वाटेवर असलेले राजन साळवी अचानक शिंदे गटाकडे, रत्नागिरीत सामंत बंधूंच्या वर्चस्वाला शह?

**दैनिक आपला विदर्भ**

**रत्नागिरी/प्रतिनिधी** : माजी आमदार राजन साळवी यांचा भाजपमध्ये प्रवेश निश्चित मानला जात होता. त्या संदर्भात वरिष्ठ पातळीवर चर्चाही झाल्या होत्या. पक्षप्रवेशाची औपचारिकता फक्त बाकी होती. मात्र भाजपमध्ये प्रवेश करण्याऐवजी राजन साळवी शिवसेनेच्या शिंदे गटात दाखल झाले. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. किरण सामंत यांच्या विरोधात निवडणूक लढविणारे साळवी अचानक शिंदे गटात का दाखल झाले याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. एकनाथ शिंदे यांनी साळवी यांना पक्षात घेऊन सामंतांच्या पक्षांतर्गत वर्चस्वाला शह देण्याचा प्रयत्न केला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगताना दिसत आहे.



रत्नागिरीत शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीत राजन साळवी यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. जिल्हाप्रमुख पदापासून पक्षांतर्गत अनेक जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या आहेत.

पक्षनिष्ठेवर ठाम

एकनिष्ठ आणि कट्टर शिवसैनिक अशी त्यांची ओळख होती. त्यांच्या प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांनी कधीच पक्षनिष्ठा ढळू दिली नव्हती. त्याचे फळही साळवी यांना मिळाले होते. सलग तीन वेळा ते विधानसभेवर निवडून गेले होते.

शिंदे यांच्या नेतृत्वाखाली २०२२ मध्ये झालेल्या उठावानंतरही त्यांनी आपली पक्षनिष्ठा ढळू दिली नव्हती. त्यामुळे त्यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चौकशीचा ससेमिरा लावण्यात आला. त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याप्रकरणी अडकवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. त्यानंतरही साळवी पक्षाशी एकनिष्ठ राहिले होते. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत किरण सामंत यांच्याकडून त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

या पराभवाला माजी खासदार विनायक राऊत जबाबदार असल्याची तक्रार त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे केली. मात्र त्याची पक्षपातळीवर दखल घेतली गेली नाही. तेव्हापासून साळवी पक्षात नाराज असल्याच्या चर्चा सुरू होत्या.

## दक्षिण मुंबईत ११ मजली इमारतीत भीषण आग, दोन महिलांचा मृत्यू

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** :मुंबईतील मशीद बंदर परिसरातील टोलेजंग अशा ११ मजली इमारतीला आग लागली. या आगीत दोन महिलांचा मृत्यू झाला. आगीचं नेमकं कारण अद्याप समोर आलेलं नाही.

दक्षिण मुंबईतील मस्जिद बंदर परिसरात असलेल्या पन्ना अली मॅन्शन इमारतीच्या तळमजल्यावरील कॉमन पॅसेजमधील इलेक्ट्रिक वायरिंगला आग लागली. ही आग इमारतीत पसरल्यानंतर पहिल्या मजल्यावरील कॉमन पॅसेजमधील दोन महिलांच्या हात आणि पायांना गंभीर दुखापत झाली. आगीनंतर धुरामुळे महिलांचा गुदमरून मृत्यू झाला. भीषण आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचं पथक घटनास्थळी पोहोचलं. मोठ्या प्रयत्नांनंतर इमारतीमधील आग आटोक्यात आणली. सकाळी ६.३१ वाजता आग विझविण्यात आली, अशी अधिकाऱ्यांनी माहिती दिली. आगीत होरपळून निघालेल्या एका महिलेला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

# 'छावा' सिनेमाची रेकॉर्ड ब्रेक कमाई, दुसऱ्या दिवसाचं कलेक्शन बघून चक्रावून जाल

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : विकी कौशलचा 'छावा' हा चित्रपट प्रदर्शित होताच सगळीकडे याच सिनेमाची चर्चा आहे. चित्रपटाला खूप चांगली पसंती मिळत आहे. एवढंच नव्हे तर सिनेमाचे बॉक्स ऑफिस कलेक्शनही सर्वोत्तम आहे. हा चित्रपट अवघ्या दोन दिवसांत प्रचंड हिट झाला आहे. छावा चित्रपटाची ओपनिंग ३१ कोटी होती. आता दुसऱ्या दिवशीही छावाने मोठी कमाई केल्याची चर्चा आहे. 'छावा' सिनेमाचं बॉक्स ऑफिस कलेक्शन काय आहे?

सॅकनिल्कच्या अहवालानुसार, छावाने दुसऱ्या दिवशी ३६.५ कोटींची कमाई केली आहे. या चित्रपटाने अवघ्या दोन दिवसांत ५० कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे. चित्रपटाच्या दुसऱ्या दिवसाचे अधिकृत आकडे अद्याप जाहीर झालेले नाहीत. पण जर चित्रपटाने दुसऱ्या दिवशी ३६.५ कोटी रुपये कमावले तर आतापर्यंत चित्रपटाचे एकूण कलेक्शन ६७.५ कोटी रुपये होईल.

व्हॅलेंटाईन डेच्या कमाईच्या बाबतीत छावाने गली बॉयला मागे टाकले आहे हे आम्ही तुम्हाला सांगतो. 'छावा'ने पहिल्या दिवशी ३१ कोटींची कमाई केली आहे. तर रणवीर सिंगच्या गली बॉयने १९.४० कोटींची कमाई केली. तर छावा हा २०२५ मधील सर्वाधिक ओपनिंग करणारा चित्रपट बनला आहे. या चित्रपटाने स्काय फोर्सला मागे टाकले आहे. स्काय फोर्सने पहिल्या दिवशी फक्त १५.३० कोटी रुपये कमावले. 'छावा'ने भारतात दोन दिवसांत ५० कोटींहून अधिक कमाईचा टप्पा ओलांडला आहे, तर स्काय फोर्सने ३ दिवसांत ५० कोटींचा व्यवसाय केला आहे.

'छावा'मध्ये विकी कौशल मुख्य भूमिकेत आहे. तर रश्मिका मंदान्ना या सिनेमात येसूबाईंची भूमिका साकारत आहे. हा चित्रपट लक्ष्मण उतेकर यांनी बनवला आहे. चित्रपटाचे संगीत ए.आर. रहमान यांनी दिले आहे. रिपोर्ट्सनुसार, चित्रपटाचे बजेट १३० कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे.

# अमरावती कृषी विभागाच्या परिसरात असलेल्या प्रशिक्षण हॉलला आग

## जुने कागदपत्रे, फर्निचर, निकृष्ट कॉटन बॅग जळून खाक

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी** : अमरावती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या प्रशिक्षण हॉलला अचानक शॉर्टसर्किटमध्ये आग लागली. मात्र, मनपाच्या अग्निशमन दलाच्या तातडीने सदर आग आटोक्यात आणली. यामध्ये हॉल मध्ये ठेवलेले साहित्य जळून खाक झाले,कृषी अधीक्षक कार्यालयाचे शंभर क्षमतेचे प्रशिक्षण हॉल( सभागृह) आहे. यामध्ये काही जुने तुटलेले फर्निचर, तसेच निकृष्ट दर्जाच्या काही कॉटन बॅग, यासह कृषी कार्यालयाच्या विविध भागातील जुने कागदपत्रे (दस्तऐवज) ठेवण्यात आले.




रविवारी सायंकाळी या सभागृहाला अचानक आग लागली.

कृषी विभागाच्या वतीने सायन्सकोर मैदान येथे कृषी प्रदर्शन सुरू आहे. त्यामुळे कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी त्या ठिकाणी कार्यरत आहे. तसेच रविवार असल्याने केवळ चौकीदारच येथे कामावर होते.

सभागृहाला आग लागल्याची माहिती चौकीदार यांनी घटनेची माहिती अग्निशमक दलाला दिली.अग्निशमन नियंत्रण कक्ष प्रमुख विलास उमेकर यांच्या आदेशानुसार अग्निशमन दलाचे तीन वाहन घटनास्थळी रवाना केली. अर्ध्या तासाच्या प्रयत्नांनी ही आग विझविण्यात आली. या घटनेत कृषी विभागाचे जुने तुटलेले फर्निचर, टेबल, खुर्च्या, निकृष्ट दर्जाच्या काही कॉटन बॅग यासह कागदपत्रे संपूर्ण जळून खाक झाले. तत्पूर्वी, शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असावी. असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित


## संक्षिप्त...

### इतवारा हद्दीत ३४ गोवंश पकडले,तिघांवर गुन्हा, अवैध धंद्याविरुद्ध धाडसत्र सुरुच



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : इतवारा भागातील इस्लामपूर देगलूर नका लक्ष्मी नगर परिसरात ३४ गोवंश कत्तलीच्या उद्देशाने नेत असताना पकडून पोलिसांनी सुटका केली रात्री केलेल्या कारवाई याप्रकरणी तिघा जणांना पोलिसांनी अटक केली आहे जिल्ह्यात अवैध धंद्या विरोधात धाडसत्र सुरू आहे. इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत उपविभागीय पोलीस अधिकारी सुशील कुमार नाईक व पोलीस निरीक्षक यांच्या पथकाने रात्री अवैधरित्या गोवंशाची कत्तल करण्यासाठी तस्करी करणाऱ्या वर कारवाई करण्यात आली आहे. या देगलूर नाका परिसरातील इमरान कॉलनी इस्लामपुरा रहीम नगर व इतर ठिकाणी धाडसत्र सुरूच होते विविध ठिकाणी केलेल्या कारवाई जवळपास ३४ सुटका करण्यात आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी तीन जणांना ताब्यात घेतले असून इतवारा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### वाळूज येथे चोरट्यांनी एटीएम मशीन फोडून तब्बल १४ लाख रुपये पळविले




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : वाळूज पंढरपूर दरम्यानच्या नायगाव बकवालनगर येथे असलेले क्सिस बँकेचे एटीएम फोडून अज्ञात चोरट्यांनी १३ लाख ९२ हजार ५०० रुपये रोख रक्कम चोरून नेली. तसेच एटीएम मशीनची मोडतोड करून व एसी युनिट जळुन नुकसान करण्यात आले आहे.



छत्रपती संभाजीनगर – पुणे महामार्गावरील वाळूज पंढरपूर दरम्यान गरवारे कंपनी समोरील नायगाव बकवालनगर येथे क्सिस बँकेचे एटीएम मशीन लावण्यात आलेले आहे. रविवारी (ता.१६) रोजी मध्यरात्रीनंतर १:४४ वाजता चारचाकी वाहनातून आलेल्या तीन ते चार चोरट्यांनी एटीएम कक्षात प्रवेश करून तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर काळा स्प्रे मारत गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम मशीन फोडून एटीएम मशीनच्या लॉबी मधील कॅशेट (ट्रे) सह १३ लाख ९२ हजार ५०० रुपये रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी हिताची पेमेन्ट सर्व्हिसेस प्रा.लि. या कंपनीचे चॅनल एक्झ्यीक्युटीव अविनाश रावसाहेब म्हस्के त्यांच्या फिर्यादीवरून वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान वाळूज पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र सहाणे यांच्यासह गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

### महाराष्ट्रात एकच महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा घ्या - अन्यथा उपोषण करणार चंद्रहार पाटलांचा इशारा



**सांगली/प्रतिनिधी** : चार-चार महाराष्ट्र केसरी हा महाराष्ट्र केसरीचा अपमान असून हा अपमान बंद करून महाराष्ट्रात एकच महाराष्ट्र केसरी स्पर्धा घ्यावी,अन्यथा सांगलीच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करणार, असा इशारा डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी दिला आहे. तसेच वन नेशन वन इलेक्शन प्रमाणे महाराष्ट्रात देखील कुस्ती संघटनेचाही एक संघटना असली पाहिजे, यासाठी लवकरच मुख्यमंत्र्यांना देखील भेटणार असल्याचं पैलवान चंद्रहार पाटील यांनी स्पष्ट केलं आहे. तसेच आमदार रोहित पवार यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या कुस्ती स्पर्धेला आपला विरोध असून याविरोधात लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा देखील पैलवान चंद्रहार पाटील यांनी दिली आहे.

# शिरपूर येथे जानगीर बाबा यांची महाशिवरात्री निमित्य भव्य यात्रा

## गुरुवारी महाप्रसाद : शुक्रवारी पालखी सोहळा

दैनिक आपला विदर्भ

**शिरपूर जैन/प्रतिनिधी** : पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री समर्थ जानगीर महाराज संस्थानवर २० ते २७फेब्रुवारी पर्यंत महाशिवरात्री निमित्त भव्य यात्रा महोत्सव व विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते ५ या वेळेत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले असून करंजी येथील संजय महाराज लहाने यांच्या मधून वाणीतून वाचन होणार आहे.

तसेच यामध्ये पूजा, आरती, गावामधून रोज सकाळी नगर प्रदक्षिणा, काकडा भजन, विष्णुसहस्रनाम पाठ, हरिपाठ, कीर्तन, भजन भक्ती, काकडा आरती, सप्ताहादरम्यान रात्री कीर्तन कार्यक्रम होणार आहेत.



यामध्ये २० फेब्रवारी रोजी नामदेव महाराज काकडे वाशीम, २१ फेब्रुवारी रोजी लक्ष्मण महाराज देवकर आळंदी देवाची, २२ फेब्रुवारी रोजी आनंद महाराज हातलेकर हातला, २३ फेब्रुवारी रोजी गणेश महाराज हुंबाड महागाव, २४ फेब्रुवारी रोजी दिलीप महाराज भुसारी आळंदी देवाची, २५ फेब्रुवारी रोजी गोपाल महाराज सरकटे हराळ, २६ फेब्रुवारी रोजी संजय महाराज लहाने करंजी यांचे कीर्तन होणार आहे. तर, २७ फेब्रुवारी रोजी संजय महाराज लहाने करंजी यांचे सकाळी काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर दुपारी महाप्रसाद वितरण करण्यात येणार आहे. सप्ताहादरम्यान भागवत पुजारी म्हणून ज्ञानेश्वर पाटील गावंडे, सिद्धेश्वरांची महापूजा आणि अभिषेक २६ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजता कैलासराव देशमरव यांच्याहस्ते बल्लू महाराज जोशी, सिताराम शेंडे, वैभव देवळे यांच्या पौराहिताने सिद्धेश्वरास अभिषेक करण्यात येणार आहे.

तर संत शिरोमणी गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त २० फेब्रुवारी रोजी सकाळी अभिषेक होमवन अश्रु शिवराम भालेराव यांच्याहस्ते करण्यात येणार आहे. सप्ताहादरम्यान रामभाऊ सखाराम गावंडे पांगरखेडा, नागोराव नथुजी इंगोले शेलगाव, अजुर्ना संभाजी खंदारे सोमठाणा, निंबाजी अमृता खंदारे सोमठाणा, अशोक वसंत गावंडे, पांगरखेडा, बाळू बबन गुडदे शिरपूर, कार्तिक सुरेश काळे, भगीरथ राजाराम भुतडा करंजी, दिलीप वामनराव वाझुळकर, केशव निवृत्ती वाझुळकर शेलगाव, प्रल्हाद दगडू टेकाळे दापरी बंद विठोबा चांदे मता अशोक नामदेव गावंडे पांगरखेडा, नारायण रामजी खाडे करंजी, संजय तुकाराम खाडे करंजी, सिताराम नामदेव बाविस्कर, मालेगाव, तलाठी कर्मचारी वृंद शिरपूर जैन यांच्याकडून अन्नदान करण्यात येणार आहे. तर, २८ फेब्रुवारी रोजी सकाळी संस्थांवरून टाळमृदंगाच्या व बँड पथकाच्या गजरामध्ये बाबांचा पालखी सोहळा काढण्यात येणार आहे. या पालखी सोहळ्यात सहभागी भजनी दिंडी मंडळांनी २७ फेब्रुवारी रोजी रात्री संस्थांवर हजर राहावे, असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे

## मध्यप्रदेश सीमेवर झालेल्या मारहाणीत जखमी पोलीसांची जिल्हाधिकारी आयुद प्रसाद यांनी घेतली भेट




दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : चोपडा ग्रामीण पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी मध्यप्रदेश सीमेवरती असलेल्या उमरटी येथे बनावट कट्टे बनवले जातात त्या आरोपींना पकडण्यासाठी गेले असता त्याच्यावर प्राणघातक हल्ला झाला. त्यात ग्रामीण पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शेषराव नितनवरे, किरण पारधी, शशिकांत पारधी जखमी झाले आहेत. ते चोपडा येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असल्याने आज जिल्हाधिकारी यांनी खाजगी हॉस्पिटल येथे भेट देऊन अधिकारी कर्मचाऱ्यांची तब्येतीची विचारपूस केलीतब्येतीची काळजी घेण्यासंदर्भात सांगितले. डॉक्टरांकडून देखील उपचाराबद्दल जाणून घेतले. यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप, तहसीलदार भाऊसाहेब थोरात हे देखील उपस्थित होते.

## फरार आरोपी कृष्णा आंधळेला तात्काळ अटक करा - धनंजय देशमुख

दैनिक आपला विदर्भ



**बीड/प्रतिनिधी** : उद्या मस्साजोग ग्रामस्थ एक महत्त्वाची बैठक घेणार असल्याची माहिती धनंजय देशमुख यांनी दिली आहे. कृष्णा आंधळे यांची संपत्ती जप्त करणे एक प्रक्रियेचा भाग आहे. मात्र कृष्ण आंधळे ला तात्काळ अटक करून त्याला फाशी देण्यात यावी असेही ते म्हणाले आहेत. ज्यावेळेस या प्रकरणातील सर्व आरोपी फासावर लटकतील त्यावेळेस आमचं समाधान होईल. तपास योग्य दिशेने आणि निष्पक्षपातीपणे चालवा यासाठी आम्ही वेळोवेळी विनंती करत आहोत. असेही देशमुख म्हणाले आहेत.

## काँग्रेस कमिटीच्या वतीने कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या प्रतिकात्मक फोटोला जोडे मारून आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री यांनी एक रुपया भिकारी घेत नाही पण आम्ही शेतकऱ्यांना एक रुपयांमध्ये विमा देतो या वक्तव्याविरोधात काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस कार्यालयासमोर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या विरोधात घोषणाबाजी करत निषेध व्यक्त करण्यात आला आहे. यावेळी कृषिमंत्री मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या प्रतिकात्मक फोटोला जोडे मारून आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी खासदार रवींद्र चव्हाण यांची प्रतिक्रिया घेतली असता ते म्हणाले



की मंत्री महोदय यांनी हे वक्तव्य करणे अत्यंत चुकीच असून एकीकडे देशाचा पोशिंदा म्हणून शेतकऱ्याची ओळख असताना शेतकऱ्या विषयी असे वक्तव्य करणे हे चुकीचे आहे त्यामुळे आम्ही हे निषेध व्यक्त केला आहे. एकीकडे शेतकऱ्यांना एक रुपयांमध्ये पिक विमा देण्याच्या नावाखाली हजारो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होतो त्याकडे मात्र या सरकारचे लक्ष नाही ते तपासण्याऐवजी शेतकऱ्यांविषयी वक्तव्य करणे हे अत्यंत चुकीच आहे असे ते म्हणाले.

## अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ जिल्हा बुलढाणा ची माध्यमिक कार्यकारणी जाहीर

दैनिक आपला विदर्भ

■ अबुतालीब खान

**सुलतानपूर** : १५ फेब्रुवारी २०२५ रोजी अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ च्या वतीने बुलढाणा जिल्हा माध्यमिक कार्यकारिणी संस्थापक अध्यक्ष तथा सरचिटणीस मा. साजिद निसार अहमद साहेब तसेच प्रमुख पाहुणे म्हणून शहीद अब्दुल हमीद एजुकेशन सोसाइटीचे अध्यक्ष मा. नवाज कासम गौली साहेब महेकर व राज्य उपाध्यक्ष नाईक तजम्मूल साहेब राज्य संघटक आबेद फारुकी सय्यद इरफान मराठवाडा विभागीय प्रचारक पठाण इलियास खान वरिष्ठ लिपिक नदीम राही विभागीय अध्यक्ष अमरावती जिल्हा खाजगी अध्यक्ष मोहम्मद मोईन रजा वाशिम व इर्शाद नाजिम रिसोड यांच्या उपस्थितीत गठीत करण्यात आली.



यावेळी नवनियुक्त १) माध्यमिक विभागीय अध्यक्ष रिजवान देशमुख, जिल्हा अध्यक्ष सय्यद इमरान सय्यद रफिद्दीन, जिल्हा सरचिटणीस शेख मोहसीन अब्दुल वहाब, जिल्हा उपाध्यक्ष मोहम्मद आबेद मोहम्मद शब्बीर,जिल्हा कार्याध्यक्ष तजम्मूल हुसेन मोहम्मद मुजममिल, जिल्हा सहसचिव मोहम्मद मुजाहेद मोहम्मद वाहेद, जिल्हा संघटक१) असलम खान सलीम खान २) शेख जुनेद शेख रहीम जिल्हा प्रसिध्दीप्रमुख १) सरवर खान शब्बीर खान २) मुधब्बिर खान फारुक खान जिल्हा सल्लागार १) शेख मजीद शेख रज्जाक २) अब्दुल हक बशीरूल हक जिल्हा कोषाध्यक्ष सय्यद फैजानोद्दीन सय्यद इकरामोद्दीन महीला प्रतिनिधी फिरदौस अजुंम दराब खान सदस्य१) शेख फारूक २) सय्यद मुश्ताक ३) लुकमान खान उस्मान खान सर्वानां अखिल भारतीय ऊर्दू शिक्षक सघांचे संस्थापक व राज्य सरचिटणीस मा. साजिद निसार अहमद साहेब यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. तसेच ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहम्मद फैजानोद्दीन सर यानां केले तसेच शेवटी आभार प्रदर्शन जिल्हा अध्यक्ष सय्यद इमरान सय्यद रफिउद्दीन यांनी केले.

# जिल्हा परिषद शाळा महारचिकणा येथे रंगला बालकांचा कलाविष्कार

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महारचिकना:** १४ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा महारचिकना येथे बालकांचा कलाविष्कार मोठ्या थाटामाटात व जल्लोष रंगला. मुलांनी वेगवेगळ्या भारुडे गवळणी देशभक्ती गीत सिने गीत नाटक इत्यादी मुलांनी बहारदार वेशभूषा केशभूषा करून अभिनय नृत्य सादर केले.

त्यामध्ये विंचू चावला, विज्ञान लावणी, व्यसनराज, जहा मी पाव मे पायल, मोबाइल बुरीबला ,दुल्हे का सेहरा यासारख्या अनेक गीत व नाटिका यांनी प्रेक्षक भारून गेले.सर्व गीत व नाटिका अगदी छान उत्स्फूर्त सादरीकरण मुलांनी केले .या सर्व सादरीकरण ला गावकऱ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

अगदी बक्षिसांचा वर्षाव केला. शाळेच्या मुलांनी सदरील गीत व नाटिकातून अंधश्रद्धा मोबाईल चे दुष्परिणाम ,बालविवाह ,मुलींचे शिक्षण आदी सामाजिक प्रश्नावर अगदी मार्मिकपणे प्रकाश टाकून सर्व गावकरी मंडळींना प्रबोधित केले. गावचे सरपंच आदरणीय शिवाजीराव ढाकणे यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले की एवढ्या ग्रामीण भागातील मुलांमध्ये टॅलेंट लपलेले असते ते व्यासपीठावर व्यक्त झाले की मुलांचा आत्मविश्वास वाढून पुढे ते यशस्वी नागरिक घडतात आणि ते जिल्हा परिषद शाळा महारचिकना करत आहे.

सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उद्धवजी ढाकणे तसेच ग्रामपंचायत सर्व सदस्य व शालेय व्यवस्थापन समिती सर्व सदस्य कार्यक्रम पाडण्यासाठी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय श्री अंभोरे सर श्री लोखंडे सर व श्री क्षीरसागर सर आदींनी अथक प्रयत्न केले.



# टोमॅटोची लाली उतरली; दर गडगडल्याने खर्चही निघेना

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/कार्य.प्रतिनिधी :** गत दीड महिन्यापूर्वी टोमॅटोला तब्बल साठ रुपये किलोच्यावर दर मिळत होता. बाजारात आवक कमी झाल्याने टोमॅटो चांगलाच भाव खाऊन होता. गेल्या दीड महिन्यापूर्वी ६० रुपये किलो प्रमाणे विक्री होणारे टोमॅटो आता मात्र, बाजारात केवळ पाच ते दहा रुपये किलो प्रमाणे विक्री होत असल्याने शेतकऱ्यांचा लागवड खर्चही वसूल होईना. परिणामी, शेतकऱ्यांवर टोमॅटो रस्त्यावर फेकून देण्याची वेळ आली आहे.अवघ्या दीड महिन्यापूर्वी भाव खाऊन बसलेल्या टोमॅटोची मात्र आता लाली उतरल्याचे चित्र बाजारामध्ये दिसून येत आहे.

टोमॅटो दैनंदिन आहारामध्ये वापरले जाते.त्याचबरोबर टोमॅटो शरीरास पोषक असल्याने बहुतांश नागरिक टोमॅटोचा आहारामध्ये मोठ्या प्रमाणात वापर करतात. गत काही महिन्यापूर्वी टोमॅटोला सफरचंदाचे भाव होता. त्यामुळे बाजारात टोमॅटो भाव खाऊन होता. गत दीड ते दोन महिन्यापूर्वी बाजारामध्ये तब्बल ६० रुपये किलोच्या वर दराने विकले जाणारे टोमॅटो आता मात्र केवळ पाच ते दहा रुपये किलोने विकले जात आहेत. बाजारात दर गडगडल्याने टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना लागवडीचा खर्चही वसूल होईना. परिणामी, टोमॅटो उत्पादन शेतकऱ्यांवर टोमॅटो रस्त्यावर फेकू देण्याची वेळ आली आहे.

टोमॅटोचे दर वधारले की, शासन प्रदेशातून माल आयात करून दरावर नियंत्रण मिळविले जाते.मात्र, आता शेतकऱ्यांना उत्पादन केलेले टोमॅटो रस्त्यावर फेकून देण्याचे वेळ आली असताना याबाबत शासन ब्रश शब्दही बोलण्यास तयार नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. बाजारात टोमॅटोचे दर अचानक गडगडल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याने शासनाने टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट अनुदान द्यावे,अशी अपेक्षा टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

## लागवड खर्चही निघेना

दीड महिन्यापूर्वी ६० रुपये किलोने मिळणारे टोमॅटो आता ५ ते १० रुपये किलोवर आले आहेत. जिल्ह्यात इतर पारंपरिक पिकाबरोबरच फळभाज्या आणि पालेभाज्यांचे उत्पादन देखील बऱ्यापैकी घेतले जाते. त्यातच आता दीड महिन्यापूर्वी ६० रुपये प्रति किलो असलेला टोमॅटो केवळ पाच ते दहा रुपये किलोवर येऊन ठेपला आहे. बाजारात टोमॅटोची आवक वाढल्याने दर मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. टोमॅटोची तोडणी आणि वाहतूक करणे यातून लागवडीचा खर्चही वसूल होत नसल्याने टोमॅटोने शेतकऱ्यांच्या मनात लाल चिखल केलाय.

**–राहुल जाधव,**
**टोमॅटो उत्पादक शेतकरी.**

## शासनाने शेतकऱ्यांना मदत करावी

शासन शेतमालाचे भाव वाढल्यानंतर त्या भावावर नियंत्रण मिळवण्यासाठी व जनतेच्या महागाईची झळ पोहोचू नये, यासाठी निर्णय घेत इतर देशातून शेतमाल आयात करून भाव पाडले जातात.मात्र, स्थानिक शेतकऱ्यांना मातीमोल भावात आपला शेतमाल विकावा लागत असल्याने या भावातून शेतकऱ्यांचा लागवड खर्चही निघत नसल्याचे दिसून येत आहे. एकेकाळी तब्बल पन्नास रुपये च्या वर किलोने विकले जाणारे टमाटे आता टोमॅटो आता केवळ पाच रुपये किलो प्रमाणे विकले जात आहे त्यामुळे मायबाप शासनाने याकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी अपेक्षा आहे.

**–विजय बावस्कर,**
**टोमॅटो उत्पादक शेतकरी.**

## शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले

गत काही दिवसापासून शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. शेतामध्ये कोणत्याही उत्पादन घेतले तर त्या उत्पादनाला कवडीमोल भाव मिळत आहे. सोयाबीन हरभरा तूर या पिकाचे काही महिने अगोदर व्हावे आताच्या भावापेक्षा दुप्पट होते. मात्र, शेतकऱ्यांच्या विक्री भावामध्ये प्रचंड घट झाली आहे या शेतमाला बरोबरच आता टोमॅटोची गरज झाली आहे. गत दीड महिन्यापूर्वी ५० ते ६० रुपये किलो प्रमाणे विक्री होणारे टोमॅटो आता केवळ पाच ते दहा रुपये किलो प्रमाणे विक्री होत असल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट उडवले आहे.ज्याप्रमाणे शासन महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी माल आयात केला जातो, त्याप्रमाणे भाव कमी झाल्या नंतर शेतकऱ्यांना तात्काळ विना अट आर्थिक मदत करावी.

**–गौतम बेगानी, शेतकरी**

# डोनगाव येथील पत्रकार अशोक वानखेडे पत्र योगी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा येथे १६ फेब्रुवारी रोजी मराठी पत्रकार परिषद संलग्नित मराठी पत्रकार परिषद बुलढाणा संघाच्या वतीने बुलढाणा जिल्ह्यातील वृत्तपत्र पत्रकारिता क्षेत्रात सेवा दिली अशा बुलढाणा जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार बांधवांचा पत्रयोगी जीवनगौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन बुलढाणा येथील गद्रे, सभागृहात १६ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले होते.

पत्रयोगी जीवन गौरव पुरस्कार वितरण सोहळ्याकरिता कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस सुरेश नाईकवाडे हे होते तर पुरस्कार वितरण सोहळ्याकरिता केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, कामगार मंत्री आकाश फुंडकर, अमरावती पदवीधर मतदार संघाचे आमदार धीरज लिंगाडे, आमदार डॉ संजय कुटे, आमदार संजय गायकवाड, आमदार सिद्धार्थ खरात. आमदार मनोज कायंदे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खाजगी सचिव विद्याधर महाले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ भागवत भुसारी, प्रसिद्ध न्युज कर प्रसन्न जोशी, मुख्याधिकारी गणेश पांडे, चंद्रकांत बर्दे, राजेश डिडोळकर. ठाणेदार नरेंद्र ठाकरे व इतर मान्यवरांच्या हस्ते बुलढाणा जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार बांधवांचा सहकुटुंब पत्र योगी जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी डोणगाव येथील ज्येष्ठ पत्रकार अशोक यादवराव वानखेडे यांना १६ फेब्रुवारी रोजी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पत्र योगी जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या कार्यक्रमाचे रणजीत सिंग राजपूत यांनी केले यावेळी अशोकराव वानखेडे यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तेव्हा पत्रकार विष्णू आखरे गजानन नरवाडे रवींद्र सुरोशे आधी उपस्थित होते.

# जिद्द व चिकाटीच्या बळावर यशाला गवसणी

## दोन भावंडाची एकाच वेळी मंत्रालय लिपिक पदासाठी निवड

दैनिक आपला विदर्भ



**डोणगाव/प्रतिनिधी :** जिद्द व चिकाटीच्या बळावर त्याचबरोबर प्रचंड परिश्रमाने नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महसुल सहाय्यक व मंत्रालय लिपिक पदांच्या परिक्षेत अल्पभुधारक शेतकरी कुटुंबातील गणेश वाघ व गोविंद वाघ या दोन भावंडांनी घवघवीत यश मिळवत यशाला गवसणी घातली आहे. इथून जवळच असलेल्या आडगाव हजारे या छोट्याशा गावातील गणेश भाऊराव वाघ व गोविंद पंडित वाघ या दोघे सख्ख्या चुलत भावांनी प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परीषदेच्या शाळेत घेऊन व माध्यमिक शिक्षण हे स्वामी विवेकानंद महाविद्यालय कोकलगांव येथे पूर्ण केले व पदवीचे शिक्षण हे वाशीम येथील सरस्वती समाजकार्य महाविद्यालय येथे पुर्ण करत असतांनाच त्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण झाली व पहिली पासूनसोबत असणाऱ्या या भावंडांनी पदवीचे शिक्षणपूर्ण झाल्यावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची तयारी सुरु केली. तयारी करत असतांना त्यांना पहिल्यांदा अपयश आले.पण जिद्द न हरता पुन्हा तयारीला लागले. अन् दुसरा प्रयत्न यसस्वी ठरला. अन् महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या महसुल सहाय्यक व मंत्रालय लिपिक पदांसाठी दोघही एकाच वेळी पात्र ठरले. जिद्द व मेहनतीच्या जोरावर त्यांनी करुन दाखवल त्यांनी या यशाच श्रेय आई वडील व जीवनातील आत्तापर्यतच्या सर्व शिक्षकांना दिले आहे. आमच्या आई वडीलांच्या कष्टाच चिज झालं. अशी प्रतिक्रिया त्यांनी नियुक्ती संदर्भात बोलताना व्यक्त केली. दोन भावांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## दिल्लीतील घटना दुर्दैवी,अशा घटना होऊ नये यासाठी प्रशासन काळजी घेईल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया

**नागपूर/प्रतिनिधी :** प्रयागराजला जाणाऱ्या भाविकांची अचानक गर्दीवाढल्याने दिल्ली रेल्वे स्टेशन येथे झालेली चेंगराचेंगरीची घटना ही दुर्दैवी आहे. अशा घटना होऊ नये, यासाठी प्रशासन काळजी घेईल, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्याचे देवेंद्र फडणवीस यांनी दिल्ली घटनेबाबत बोलताना दिली. यावेळी ते पुढे म्हणाले की, वेलीबल ग्रुप आणि सत्संग फाउंडेशन एक चांगला उपक्रम घेतला. एक संधी उपलब्ध करून दिली तसेच महाराष्ट्रातील प्रमुख संतांच्या पादुका या ठिकाणी आणलेल्या आहेत. इतक मोठा कुंभ पर्व सुरू असताना जाऊ शकत नाही, हे शल्य होतं त्यांच्यासाठी अतिशय चांगली व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली. दिल्लीतील दुर्घटना दुर्दैवी आहे. त्यावर सगळ्यांनी दुःख व्यक्त केल आहे. अशा पद्धतीच्या घटना होऊ नये, यासाठी प्रशासना निश्रि्चत स्वरूपांना कारवाई करेल.सुप्रीम कोर्टाने लव्ह जिहादची वास्तविकता दिसून आली आहे, एका धर्माच्या व्यक्तीने दुसऱ्या धर्माच्या व्यक्तीशी लग्न करणे गैर काही नाही. पण खोट बोलुन लग्न करणे आणि मूल जन्माला घालून सोडून देणे, हे जे काही सुरू आहे ते अत्यंत वाईट आहे. यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# खारपाणपट्ट्यातील आरोग्य समस्यांकडे डॉ. सुरज सावजीने वेधले लक्ष

## कुलगुरू कट्टा कार्यक्रमात मांडल्या समस्या

दैनिक आपला विदर्भ



**डोणगाव/प्रतिनिधी :** आदिवासीबहूल संग्रामपूर, जळगाव जामोद तसेच शेगाव या भागातील नागरिकांना खारपाणपट्ट्यामुळे किडनी आजारा सारख्या अनेक गंभीर आजारांना सामोरे जावे लागत आहे. खारपाणपट्ट्यामुळे अनेकांचा बळी गेला आहे. आजही अनेक लोक किडनी आजारग्रस्त आहेत. हा आरोग्याचा गंभीर प्रश्न असताना याकडे मात्र, कायम दुर्लक्ष करण्यात आले आहे. परिणामी, या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. खारपाणपट्ट्यातील नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी काय उपाययोजना करता येतील, याकडे एमबीबीएसचा विद्यार्थी डॉ. सुरज सावजी याने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विभागाचे लक्ष वेधले. ते कुलगुरु कट्टा कार्यक्रमात बोलत होते.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ चे कुलगुरू लेफ्टनंट कर्नल डॉक्टर माधुरी कानिटकर यांनी १४ फेब्रुवारी रोजी आयोजित केलेल्या कुलगुरू कट्टा या कार्यक्रमाला विद्यापीठाच्या इतर मान्यवरांसोबतच मंदार पाटील, दिया गौरकर ,कृतिका निकम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. सुरज सावजी हा माटुंगा येथे एन.वाय. तासगावकर मेडिकल कॉलेजला तिसऱ्या वर्षात वैद्यकीय शिक्षण घेत आहे.तर, सुरज सावजी माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांचा नातू आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञानतर्फे कुलगुरु लेफ्टनंट कर्नल डॉ. माधुरी कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली कुलगुरु कट्टा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी बुलढाणा जिल्ह्यातील खारपाणपट्टयात उद्भवणाऱ्या किडनीजन्य आजाराकडे सुरजने सर्वांचे लक्ष वेधले. या आजाराविषयी आरोग्य विज्ञान विभागाला काय पावले उचलता येतील, असा प्रश्न करत उपाययोजनेची मागणी केली. शेगाव, संग्रामपूर व जळगाव जामोद या भागात किडनी आजार फोफावला आहे. अलीकडच्या काळात शासनाने याकडे लक्ष घालून फिल्टर पाणी, आरोचे पाणी देत आहे. मात्र, ज्यांना किडनीजन्य आजार झाला आहे, त्यांच्यासाठी अजूनही चांगल्या आरोग्य सेवा उपलब्ध नाहीत. डायलेसिस केले जाते. मात्र, मूळ पाणी हा मुद्दा आहे. स्वच्छ पाणी नागरिकांना उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यातच किडनीग्रस्तांना चांगले उपचार मिळावे, या भागात आरोग्य सेवा उपलब्ध कराव्या, अशी अपेक्षा सावजी आणि व्यक्त केली. कार्यक्रमाला वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## एम्ससोबत मिळून आरोग्यविषयक समस्यां निवारण्यासाठी ग्रुप बनवा

डॉ.सुरज सावजी यांच्या प्रश्नावर बोलताना कुलगुरु डॉ. माधुरी कानिटकर म्हणाल्या, ज्या प्रमाणे राज्यातील इगतपुरीकडील आरोग्य समस्येसाठी नाशिकल प्रोजेक्ट सुरू केला, त्याचप्रमाणे तुम्ही नागपूर एम्ससोबत मिळून ग्रामीण भागातील तुमच्या जिल्ह्यातील खारपाणीपट्ट्यामधील आरोग्यविषयक समस्यां निवारण्यासाठी ग्रुप बनवा. त्यासाठी लागणारा फंड, परवानगी आम्ही तुम्हाला देऊ, असा शब्द देत सुरज सावजीचे कौतुक केले. एम्ससोबत मिळून ग्रामीण भागातील तुमच्या जिल्ह्यातील खारपाणीपट्ट्यामधील आरोग्यविषयक समस्यांसाठी ग्रुप बनवा आपल्या भागातील समस्यांप्रती जागृत होऊन त्यावर संशोधन, उपचार हे आपले कर्तव्य असून ते आपण डॉक्टर या नात्याने करायलाच हवे, असेही कानिटकर म्हणाल्या.

# महागाव तालुक्यातील मोरथ येथे गुप्तधनाचा शोध घेणाऱ्या दहा जणांना अटक



संग्रहीत छायाचित्र



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** महागाव तालुक्यातील मोरथ येथे गुप्तधनाचा शोध घेणाऱ्यांविरुद्ध महागाव पोलिस ठाण्यात जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून, दहा जणांना अटक केली. आरोपींकडून दोन कार, एक मेटल डिटेक्टर, लिंबू, पूजेचे साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे. या कारवाईनंतर मोरथ च्या वाड्यांवर गुप्तधन शोधणाऱ्या टोळ्यांच्या डोळा असल्याचे दिसत आहे. सोन्याचा धूर निघणारे मोरथ अशी या गावाची ओळख होती. या ठिकाणी १० ते १२ वाडे आहे. आजमितीस बहुतांश वाडे मोडकळीस आले असले तरी येथे सोन्याचे हंडे पुरलेले असल्याची चर्चा नेहमीच पंचक्रोशीतून ऐकायला मिळते. त्यातूनच गुप्तधन शोधणाऱ्या टोळ्यांनी या वाड्यांना लक्ष्य केले आहे.